# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## महा मेट्रो नागपूर व एनएचएआयमध्ये दोन राष्ट्रीय महामार्गांवर व्हायाडक्ट बांधकामासाठी सामंजस्य करार




नागपूर: नागपूर शहरातील शहरी वाहतूक व्यवस्थेच्या सुधारणा दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) आणि महा मेट्रो नागपूर यांच्यात औपचारिक सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे. या कराराअंतर्गत नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक (NH) - ४४ आणि (NH) -५३ वर मेट्रो व्हायाडक्टचे बांधकाम करण्यात येणार आहे

हा करार नागपूरमधील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) प्रादेशिक कार्यालयात श्री राकेश प्रकाश सिंग (मुख्य महाव्यवस्थापक व प्रादेशिक अधिकारी, NHAI), श्री नरेश गुरबानी (कार्यकारी संचालक, महा मेट्रो) आणि श्री आर. अरुण कुमार (कार्यकारी संचालक, महा मेट्रो) यांच्या उपस्थितीत स्वाक्षरीत करण्यात आला. या करारामुळे

महा मेट्रोला राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ आणि ५३ वर जामठा  ते बुटीबोरी (NH-44) आणि एच.बी. टाउन ते ट्रान्सपोर्ट नगर (NH-53) — या दोन महत्त्वाच्या मार्गांवर NHAIच्या 'राईट ऑफ वे' (RoW)चा वापर करून उन्नत मेट्रो मार्गिका उभारण्याची परवानगी मिळणार आहे.

- सामायिक पायाभूत सुविधा, सामायिक दृष्टिकोन

या सामंजस्य कराराअंतर्गत उड्डाणपूल आणि मेट्रो व्हायाडक्टसाठी एकत्रित पायाभूत सुविधा उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये एकत्रित संरचना उभारण्यावर भर देण्यात येत आहे. विशेषतः जामठा आणि डोंगरगाव येथे प्रस्तावित असलेल्या दोन सहा लेनच्या उड्डाणपूलांसाठी मेट्रो व्हायाडक्टसोबत एकाच संरचनेचा उपयोग केला जाणार आहे. ही रचना वाहनांच्या अंडरपाससाठीही उपयुक्त ठरणार असून, यामुळे जागेचा तसेच निधीचा अधिक कार्यक्षम आणि परिणामकारक वापर करता येणार आहे.

- अभियांत्रिकी अचूकतेसाठी आणि सार्वजनिक सुरक्षेसाठी कटिबद्धता

या करारात दोन्ही यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय साधण्याचा स्पष्ट आराखडा असून, सर्व डिझाईन्स भारतीय रस्ते काँग्रेस (IRC) च्या मार्गदर्शक तत्वांनुसार तयार करण्यात येणार आहेत. त्यामुळे सहा लेनच्या रस्ते विस्तारीकरणामध्ये आवश्यक सुरक्षा आणि किमान ६ मीटर उंचीची स्पष्टता सुनिश्चित केली जाईल. वाहिन्यांचे स्थलांतर, वाहतूक वळवणे आणि रस्त्याचे पुनर्बांधणी यासाठी दोन्ही संस्था समन्वयाने कार्य करतील.

कामाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता आणि सुरक्षितता याची खातरजमा करण्यासाठी दोन्ही विभागांचे स्वतंत्र अधिकारी संयुक्तपणे स्थळ पाहणी करतील.

- पुढील वाटचाल

या सामंजस्य कराराचे वर्णन एका रणनीतिक सहकार्याच्या रूपात करता येईल, जे नागपूरच्या वेगाने विस्तारत असलेल्या पायाभूत विकासाला चालना देणार आहे. राष्ट्रीय महामार्गांचा विकास आणि सार्वजनिक वाहतुकीची व्यापक व्यवस्था या दोहोंना एकत्र आणण्याचा हा प्रयत्न आहे. नागपूरकरांसाठी हा करार भविष्यातील जलद, कार्यक्षम आणि सुरक्षित प्रवासाची दिशा निश्चित करणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.